# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

दिनांकः12.08.2026 वारःबुधवार

---

1. केरळ नामांतर विधेयक आणि 'राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळ दुरुस्ती विधेयक केंद्रिय गृहमंत्री अमित शहा आज राज्यसभेत सादर करणार
2. 'विकसित भारत' घडवण्याचा संकल्प करून स्वातंत्र्यदिन अभिमानाने आणि मोठ्या उत्साहाने साजरा करण्याचं पंतप्रधानांचं आवाहन
3. 'हरियाली अमावस्या'निमित्त देशभरांत भव्य वृक्षारोपण मोहिम-केंद्रिय कृषीमंत्री शिवराज सिंग चौहान दिल्लीत सहभागी होणार
4. महाराष्ट्राला जागतिक क्षमता केंद्रांसाठी अर्थात जिसीसी साठी देशातलं आघाडीचं केंद्र म्हणून ओळख निर्माण करण्याचा निर्धार-मुख्यमंत्र्यांचं प्रतिपादन आणि
5. हिमाचल प्रदेशातील 12 जिल्ह्यांना मुसळधार पावसाचा इशारा.

**अमित-शहा**

संसदेच्या पावसाळी अधिवेशनात केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आज राज्यसभेत केरळ नामांतर विधेयकावर चर्चा आणि संमतीसाठी पटलावर मांडणार आहेत. लोकसभेनं हे विधेयक कालच मंजूर केलं आहे. तसेच, आज राज्यसभेत 'राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळ दुरुस्ती विधेयक, 2026' चर्चा आणि मंजूर होण्याची अपेक्षा आहे.

लोकसभेत 'खाणी आणि खनिजे विकास आणि नियमन दुरुस्ती विधेयक, 2026' विचारार्थ आणि संमतीसाठी मांडले जाईल.

**संसद अधिवेशन**

राज्यसभेने काल न्यायाधिकरण सुधारणा विधेयक 2026 मंजूर केलं. दिवसभराचं कामकाज पूर्ण झाल्यानंतर राज्यसभेचं कामकाज तहकूब करण्यात आलं. तत्पूर्वी, 'नीट' परीक्षेच्या मुद्द्यावरून विद्यार्थ्यांच्या निदर्शनांदरम्यान झालेली कथित पोलीस कारवाई आणि इतर विविध मुद्द्यांवरून सभागृहात दिवसभर गदारोळ पाहायला मिळाला. यासह इतर विविध मुद्द्यांवरून गदारोळाचं सत्र सुरूच राहिल्यानं लोकसभेचं कामकाज कालही दिवसभरासाठी तहकूब झालं. लोकसभेने 'केरळ नाम बदल विधेयक, 2026' मंजूर केल्याने राज्यघटनेच्या पहिल्या अनुसूचीमध्ये केरळ राज्याचं नाव 'केरळम' करण्याचा प्रस्ताव आहे. लोकसभेने 'राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळ-सुधारणा विधेयक, 2026' देखील मंजूर केलं. विविध मुद्द्यांवरून विरोधी पक्षांनी केलेल्या गदारोळादरम्यान ही दोन्ही विधेयके कोणत्याही चर्चेविना मंजूर करण्यात आली.

दरम्यान केंद्रीय संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी काँग्रेस आणि विरोधी पक्षांवर विद्यार्थ्यांच्या निदर्शनांबाबतच्या चर्चेपासून पळ काढल्याचा आरोप केला आणि सरकार या मुद्द्यावर सविस्तर चर्चा करण्यास तयार असल्याचं सांगितलं. गृहमंत्री अमित शहा हे देखील विरोधी पक्षांनी उपस्थित केलेल्या मुद्द्यांना उत्तर देण्यास तयार आहेत, परंतु विरोधी पक्ष सभागृहाचं कामकाज चालू देत नाहीत. असा आरोप त्यांनी केला.

**पंतप्रधान**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना 'विकसित भारत' घडवण्याचा संकल्प करून स्वातंत्र्यदिन अभिमानाने आणि मोठ्या उत्साहाने साजरा करण्याचं आवाहन केलं आहे. समाजमाध्यमावर यासंदर्भातील ध्वनीचित्रफित त्यांनी प्रसारित केली आहे.

प्रत्येक नागरिकाला एकत्र येऊन देशाच्या स्वातंत्र्यसैनिकांना आदरांजली वहावी आणि 'हर घर तिरंगा' मोहिमेअंतर्गत सर्वांनी आपापल्या घरी तिरंगा फडकवावा, असे आवाहनही पंतप्रधानांनी केले.

**कोविन्द पुस्तक प्रकाशन**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते नवी दिल्ली इथं आज माजी राष्ट्रपती रामनाथ कोविन्द यांच्या 'ट्रायम्फ ऑफ द इंडियन रिपब्लिक : माय लाईफ, माय स्ट्रगल्स' या आत्मचरित्राचं प्रकाशन होणार आहे.

**सेबी**

भारतीय रोखे आणि विनिमय मंडळा अर्थात सेबीने आपल्या नियमावलींतर्गत सूचीबद्ध नगरपालिका कर्ज रोखे असलेल्या नगरपालिकांसाठी, स्टॉक एक्स्चेंजकडे आर्थिक निष्कर्ष सादर करण्याच्या मुदतीत शिथिलता दिली आहे. काल जारी केलेल्या सुधारित आराखड्यानुसार, सूचीबद्ध नगरपालिकांना आता पहिल्या सहामाहीनंतर 60 दिवसांच्या आत सहामाही लेखापरीक्षण न झालेले' आर्थिक निष्कर्ष सादर करावे लागतील; यापूर्वी ही मुदत 45 दिवसांची होती. तसंच, वार्षिक 'लेखापरीक्षित' आर्थिक निष्कर्ष आणि लेखापरीक्षण अहवाल आर्थिक वर्ष संपल्यापासून 90 दिवसांच्या आत सादर करावे लागतील; यापूर्वी ही मुदत 60 दिवसांची होती.

**शिवराज**

'हरियाली अमावस्या'निमित्त नवी दिल्लीत एका भव्य वृक्षारोपण मोहिमेची सुरुवात केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांच्या हस्ते आज होणार आहे. त्यांच्या 'वृक्ष मित्र अभियाना' अंतर्गत देशभरातील हजारो सदस्यही त्यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत आपापल्या गावांमध्ये आणि शहरांमध्ये वृक्षारोपण मोहिम राबवणार आहे. देशभरात 50 हजारांहून अधिक रोपे लावण्याचा सामूहिक संकल्प करण्यात आला आहे.

**मुख्यमंत्री**

"महाराष्ट्राला जागतिक क्षमता केंद्रांसाठी अ4था जिसीसी साठी देशातलं आघाडीचं आणि सर्वाधिक पसंतीचं ठिकाण बनविण्याचा राज्य शासनाचा निर्धार असून, राज्यात 400 नवीन जागतिक क्षमता केंद्रे, 4 लाख उच्च कौशल्याधारित रोजगाराच्या संधी आणि 50 हजार कोटी रुपयांची गुंतवणूक आकर्षित करण्याचं महत्त्वाकांक्षी उद्दिष्ट निश्चित करण्यात आलं आहे", असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. काल पुण्यात जीसीसीप्रोज नेतृत्व शिखर परिषदेत मुख्यमंत्री बोलत होते. यावर्षाअखेरपर्यंत जागतिक क्षमता केंद्रांच्या क्षेत्रात पुणे शहर देशाचं नेतृत्व करेल, असा विश्वासही मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

“हर घर तिरंगा” अभियानांतर्गत पुण्यात मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वाखाली काल तिरंगा यात्रेचं आयोजन करण्यात आलं.

**अमेरिका-इस्त्रो**

अमेरिकेच्या अंतराळ संशोधन संस्था अर्थात नासाने भारतीय अंतराळ संशोधन संस्था, ISRO ला आपल्या 'मून बेस' कार्यक्रमात सहभागी होण्याचे निमंत्रण दिले आहे. 'आर्टेमिस करारां'अंतर्गत असलेल्या भागीदारीच्या आधारे, या करारांअंतर्गत वैज्ञानिक माहितीच्या देवाणघेवाणीबाबत सहकार्य करण्यासाठी चर्चा पुढे नेण्यावर भारत आणि अमेरिका सहमत झाले आहेत. 'भारत-अमेरिका अंतराळ संयुक्त कार्यगटा'ची नववी बैठक 5 आणि 6 ऑगस्ट रोजी बेंगळुरू इथल्या इस्त्रोच्या मुख्यालयात आयोजित करण्यात आली होती. या बैठकीच्या उद्घाटन सत्रात इस्त्रोचे अध्यक्ष डॉ. व्ही. नारायणन आणि भारतातील अमेरिकेचे राजदूत सर्जिओ गोर यांनी मार्गदर्शन केले. द्विपक्षीय अंतराळ सहकार्य अधिक दृढ करण्याच्या महत्त्वावर त्यांनी यावेळी भर दिला.

**सर्वोच्च-न्यायालय**

कर्करोगाचे लवकर निदान व्हावं आणि रुग्णांची योग्य काळजी घेतली जावी, यासाठी कर्करोगाला 'अधिसूचित आजार' म्हणून घोषित करण्याचा विचार करावा, असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने उर्वरित 19 राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना दिले आहेत. भारताचे सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठाने काल हे निर्देश दिले. संसदीय स्थायी समितीच्या

शिफारशींनुसार, 36 पैकी 17 राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांनी कर्करोगाला आधीच 'अधिसूचित आजार' म्हणून घोषित केले असल्याची माहिती न्यायालयाला देण्यात आली. देशभरात कर्करोगाला 'अधिसूचित आजार' म्हणून घोषित करण्याचे निर्देश देण्याची मागणी करणाऱ्या एका जनहित याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वीच केंद्र सरकार तसेच सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना नोटिसा बजावल्या होत्या.

**कृषी**

देशभरात 7 ऑगस्ट पर्यंत 967 लाख हेक्टर जमिनीवर खरिपाच्या पेरण्या पूर्ण झाल्याची माहिती  कृषी मंत्रालयाने दिली आहे. त्यात 344 लाख हेक्टर जमिनीवर भात आणि 180 लाख हेक्टर क्षेत्र तेलबियांखाली असून गेल्यावर्षीपेक्षा यावर्षी हे क्षेत्र 5 लाख हेक्टरने वाढलं आहे. श्री अन्न अर्थात भरड धान्याखाली 168 लाख हेक्टर जमीन असून 106 हेक्टर क्षेत्रावर कापूस , तर 103 लाख हेक्टर क्षेत्रात कडधान्यांची लागवड झाली आहे.  उसाखाली 58 लाख हेक्टर तर तागाची लागवड 6 लाख हेक्टर क्षेत्रात आहे.

**केरळ**

वारसांना आदरांजली वाहण्याचा उत्सवादरम्यान केरळममधील हजारो नागरिकांनी आज पहाटे कर्क्किडका वावुच्या शुभ प्रसंगी पिथरू थार्पनम अर्पण करण्यास सुरुवात केली. मल्याळम पंचांगातील 'कर्कडक' महिन्यातील अमावास्येचा दिवस हा हिंदू परंपरेत आपल्या वारशांच्या शांतीसाठी पवित्र मानला जातो.

**कोलंबिया**

कोलंबियात झालेल्या भुकंपानंतर आज बचाव पथकांनी इमारतींच्या ढिगाऱ्याखाली अडकलेल्यांना बाहेर काढण्यासाठी युध्दपातळीवर शोध आणि बचावकार्य करत आहेत. या भूकंपामुळे आतापर्यंत 250 नागरिकांचा मृत्यू झाल्याचां अंदाज आहे. सोमवारी पहाटे कॉफी उत्पादक पट्ट्यात 7 पुर्णांक 4 रिखटर  तीव्रतेचा हा भूकंपाचा जोरदार धक्का बसला त्यामुळे कोलंबियातील जनजीवन विस्कळीत झालं आहे.  राष्ट्राध्यक्ष अबेलार्डो डी ला एस्प्रिएला यांनी बाधित भागांना भेट दिली बाधित नागरिकांना आर्थिक मदत देण्याचं आश्वासन दिलं.

**हवामान**

भारतीय हवामान विभागानं आज  राजस्थानचा पूर्व भाग, पश्चिम बंगालचा काही भाग, मध्य महाराष्ट्र आणि ओडिशा ला मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. हिमाचल प्रदेशात अनेक ठिकाणी सतत पडणाऱ्या पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. अनेक ठिकाणी दरडी कोसळण्याच्या घटनांमुळे वाहतुकीवर परिणाम झाला असून, काही भागातील वीज आणि पाणीपुरवठा विस्कळीत झाला आहे. हवामान विभागाने राज्यातील सहा जिल्ह्यांमध्ये पुढील 12 तासांत मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं

# नमस्कार.